**शपथेवर उलटतपास जाबदार यांचेतर्फे**

**विधीज्ञ श्री. एस. एस. मुतालिक यांच्यामार्फत सुरू**

८. मी जाबदार कारखान्यात सेवेत असताना दि. १६/१०/२००३ रोजी कारखान्यातर्फे मला आरोपपत्र देण्यात आले होते. आता मला आरोपपत्र दाखविले. सदर आरोपपत्र हे तेच आहे. त्यास **निशाणी सी—४५** देण्यात आला. त्या अनुषंगाने दि. १५/०६/२००३ रोजी माझा जबाब नोंदविण्यात आला होता, त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी सी—४६** देण्यात आला.

९. मी कारखान्यात वाहतुक विभागात कार्यरत होतो. वाहतुक विभागाकडे काम करीत असताना कारखान्याच्या बुलडोझरमार्फत भुसा एकत्रित करण्याचे काम करीत होतो. त्या बुलडोझरकरीता इंधन म्हणून डिझेल लागत होते. कारखान्यामार्फत बुलडोझरकरीता डिझेल आणणेसाठी मला रिक्वीझीशन स्लिप दिली जात होती. दि. १४/०६/२०१३ रोजी वाहतुक विभागाने माझे नावे २०० लिटर डिझेलची रिक्वीझीशन स्लिप दिली होती. सदर रिक्वीझीशन स्लिपला **निशाणी सी—४७** देण्यात आला. दि. १४/०६/२०१३ रोजी डिझेल संपल्यामुळे मी दि. १५/०६/२०१३ रोजी पंपावर डिझेल आणणेकरीता गेलो होतो. स्लिपवर १४ ऐवजी १५ तारीख करून मी पंपावर दिली होती हे म्हणणे खरे नाही. १४/०६/२०१३ रोजी मी पंपावर गेलो होतो व त्यादिवशी डिझेल संपल्याचे आजरोजी मी पश्चातबुध्दीने सांगत आहे हे म्हणणे खरे नाही.

विधीज्ञ श्री. मुतालिक यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आली.

**सही/—**

स्थळ : सांगली

( एस. जी. कोरे )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली.

दि. ०९/०९/२०२५